**ठळक बातम्या**

- यंदाच्या खरीप हंगामात राज्यानं २ कोटी ४ लाख टन उत्पादनाचं लक्ष्य ठेवल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची माहिती

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताची बाजू जगभरात मांडण्यासाठी शिष्टमंडळं रवाना व्हायला सुरुवात

- छत्तीसगडमधे झालेल्या चकमकीत बसवराजूसह २७ माओवादी ठार, एक जवान शहीद

- ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**आणि**

- केरळमध्ये येत्या तीन ते चार दिवसात मान्सून पोचण्याची शक्यता, राज्यात पुढचे चार दिवस जोरदार पावसाचा अंदाज

**<><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामात राज्यानं २ कोटी ४ लाख टन उत्पादनाचं लक्ष्य ठेवल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिली. खरीप हंगामासाठीची पीक आढावा बैठक त्यांच्या उपस्थितीत मुंबईत झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. यंदाच्या हंगामासाठी राज्यात आवश्यक बियाणं आणि खत उपलब्ध आहे, त्याचा तुटवडा पडू दिला जाणार नाही, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. बोगस बियाण्याचे प्रकार थांबवण्यासाठी ट्रूथफूल बियाण्यांची नोंदणी साथी पोर्टलवर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदा राज्यातल्या ७० टक्के बियाण्यांची नोंदणी या पोर्टलवर झाली असून पुढच्या वर्षी ती शंभर टक्के होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यभरात डिजिटल शाळांद्वारे शेतकऱ्यांना

मार्गदर्शन केलं जात आहे, शेतीविषयी माहिती देणारं महाविस्तार ॲप सरकारनं सुरू केलं आहे. या ॲपद्वारे शेतकऱ्यांना आवश्यक ती सर्व माहिती, तसंच यातल्या चॅटबोटद्वारे कोणत्याही प्रश्नाचं उत्तरही मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्य सरकार शेतीमधे गुंतवणूक वाढवण्याचा प्रयत्न करत आहे, असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (२३ सेकंद)**

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान होतं. त्यामुळे हवामान विभागाच्या मदतीनं नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना शेतकऱ्यांना दिली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, तसंच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतात सध्या दीड लाखाहून अधिक स्टार्टअप्स कार्यरत असून भविष्यात भारत हे जगातलं सर्वोत्तम स्टार्टअप केंद्र बनू शकतं, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत गोरेगाव इथं आयोजित स्टार्टअप कॉन्क्लेव २०२५ मध्ये बोलत होते.

स्टार्टअप आणि उद्योगांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी फिनटेक धोरण तयार करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असून, मुंबई हे देशात सर्वाधिक निधी प्राप्त करणाऱ्या स्टार्टअपचं हब बनलं आहे, स्टार्टअप्सच्या बाबतीत संपूर्ण देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असून २०२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, देशातले २४ टक्के, म्हणजे २६ हजार ६८६ स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत. असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरची माहिती सर्व देशांना देण्यासाठी आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद जगासमोर आणण्यासाठी भारतानं आखलेल्या धोरणांतर्गत संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालचं सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज

पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झालं. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल.

शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळही आज रवाना होणार आहे. हे शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिराती, काँगो, लायबेरिया आणि सिएरा लिओन या देशांना भेट देईल.

या धोरणांतर्गत एकूण सात सर्वपक्षीय शिष्टमंडळं ५ जूनपर्यंत ३२ देशांना भेट देऊन भारताची भूमिका समजावून सांगणार आहेत.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्तानं ऑपरेशन सिंदूरचं यश अधोरेखित करण्यासाठी **नागपूर शहर काँग्रेसनं** तिरंगा यात्रा काढली.

**लातूर जिल्ह्यात**ही शिवसेनेतर्फे तिरंगा यात्रा काढण्यात आली. काँग्रेसच्या जिल्हा समितीतर्फे आज **वाशीम** इथल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातून तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत माजी सैनिक सहभागी झाले होते.

**रायगड जिल्ह्यात** पनवेल-उरण महाविकास आघाडीनं आज तिरंगा यात्रा काढली होती.

**नाशिक जिल्ह्यातही** तिरंगा यात्रा काढण्यात आली. त्यावेळी माजी सैनिक विजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली…

**होल्ड… विजय शिरसाट माजी सैनिक बाईट (१९ सेकंद)**

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना धडा शिकवल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष देशभर भारत जिंदाबाद यात्रा काढणार आहे. पक्षाचे

अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. २२ मे ते ६ जून या काळात ही यात्रा आयोजित केली जाणार आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या नारायणपूर, विजापूर आणि दंतेवाडा भागात सुरक्षादलांशी ५० तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या चकमकीत २७ माओवादी ठार झाले. यात कुख्यात माओवादी आणि सीपीआय-माओइस्टचा सरचिटणीस नंबाला केशव राव उर्फ बसव राजू याचाही समावेश आहे. या कारवाईदरम्यान सशस्त्र दलाचा एक जवान शहीद झाला, तर आणखी एक जवान जखमी झाला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कारवाईचं कौतुक केलं असून माओवादाचं समूळ उच्चाटन करायला सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. ही कारवाई म्हणजे माओवादाचा नायनाट करण्याच्या लढाईतलं महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्यावर आज पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी बंदुकांच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली. आज सकाळी त्यांचं पार्थिव आयुका इथं अंत्यदर्शनासाठी ठेवलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासह इतर मान्यवरांनी डॉ. नारळीकरांचं अंत्यदर्शन घेतलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राजस्थानातल्या बिकानेर इथून देशातल्या १०३ अमृत भारत रेल्वेस्थानकांचं उद्घाटन करणार आहेत. अमृत भारत स्थानक

योजनेअंतर्गत या रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास करण्यात आला असून स्थानिक संस्कृती आणि वारसा अधोरेखित करणारी सजावट इथं केली आहे. यात महाराष्ट्रातल्या १५, तर मुंबईतल्या चिंचपोकळी, परळ, वडाळा रोड आणि माटुंगा या चार स्थानकांचा समावेश आहे. १५ महिन्यांच्या कालावधीत ७१ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्चून या स्थानकांचा पुनर्विकास केला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईच्या वानखेडे मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. या सामन्यावर पावसाचं दाट सावट आहे.

दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

यंदा मान्सूनचं आगमन वेळेआधीच होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. केरळमधे १ जूनला मान्सून पोचतो, मात्र यावेळी तो पाच दिवस आधीच म्हणजे येत्या तीन ते चार दिवसात पोचण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, असं हवामान विभागाचं शास्त्रज्ञ नरेश कुमार यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. त्यानंतर तीन ते चार दिवसात तो बंगाल आणि ईशान्येकडे सरकेल, असं ते म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्र, केरळ, गोवा, आणि कर्नाटक किनारपट्टीवर जोरदार पाऊस सुरु असून पुढचे पाच ते सहा दिवस अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

**धाराशिव जिल्ह्यात** आजही बहुतांश भागात पावसाचा जोर आहे. दुपारपासून पावसाची संततधार सुरू आहे.

**रत्नागिरी जिल्ह्यात** काल सुरू झालेला पाऊस आजही दिवसभर सुरूच आहे. पावसामुळे झाडं पडल्यानं, रस्त्यावर चिखल आल्यामुळे काही ठिकाणी वाहतूक विस्कळीत झाली. वीजपुरवठा खंडित होण्याचं सत्र आजही अनेक ठिकाणी सुरूच आहे.

**लातूर जिल्ह्यात** ही सलग चौथ्या दिवशी अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. पावसामुळे लातूर जिल्ह्यातही शेती पिकांचं विशेष करून कांदा पीकाचं मोठं नुकसान झालं आहे.

गेल्या चार दिवसांपासून **सोलापूर शहर आणि जिल्ह्यात** दमदार पाऊस पडत आहे. सातत्यानं पडणाऱ्या पावसामुळे तापमानातही लक्षणीय घट झाली आहे. या पावसाचा मोठा फटका फळबागांना बसला आहे.

**<><><><><>**